University Grants Commission (UGC)
Sponsored Two Days Interdisciplinary
National Level Conference
On

MORAL PHILOSOPHY

IMPORTANCE OF HUMAN VALUES IN MODERN SOCIETY

Editor

Prof. Aman Bagade

Head, Dept. Of Philosophy

New Arts, Commerce & Science College, Ahmednagar

Proceedings of UGC Sponsored Interdisciplinary National Conference

Ahmednagar Jilha *Maratha* Vidya Prasarak Sanstha's,

New Arts, Commerce & Science College, Ahmednagar

DEPARTMENT OF PHILOSOPHY

Organized

A TWO DAYS INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON

MORAL PHILOSOPHY: IMPORTANCE OF HUMAN VALUES IN MODERN SOCIETY

21ST & 22ND AUGUST 2015

Editor

Prof. Aman Bagade

Editorial:

The editors and editorial board with great pleasure to place before the readers of the **National Conference** on "Moral Philosophy: Importance Of Human Values In Modern Society"

The papers presented by the participants have made the proceedings of the seminar book enrich with the knowledge resources. The timely publication of seminar book was the collective efforts of our editors, editorial board and the technical staff. The seminar has focus goal to promote all round development of the students. We thank all the authors for their contribution and expect continued contribution in future from everyone.

Disclaimer:

The views expressed in the seminar book are those of author's and not the publishers or the Editorial Board. The readers are informed; editors or the publishers do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work. The articles/papers published in the seminar book are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publishers.

Published by:

Success Publications
Radha Krisna Apartment, 535, Shaniwar Peth,
Opp.Prabhat Theatre, Pune - 411030.
Contact - 9422025610, 020-24433374, 24434662
Website- www.sharpmultinational.com

For

Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Sanstha's,
New Arts, Commerce & Science College, Ahmednagar

INDEX

Sr. No.	Title Of The Paper	Name Of The Author	Page No.
	I. Importance of Human Values in Modern Society		
1	निरपेक्ष चिंतनातून खऱ्या मुल्यांकडे वाटचाल	डॉ. सुरेन्द्र गायधने	1
2	मूल्य–एक दृष्टि	डॉ. राहुल वर्मा	3
3	Dr. Babasaheb Ambedkar's Conception of Morality	Dr. Harishchandra Navale	5
4	मानवी जीवनात मूल्यांचे महत्त्व	प्रा. डॉ. खलील नबीसाब सय्यद	11
5	सदाचार एक मानवीय मूल्यः इस्लामिक नैतिकता के सन्दर्भ में एक मूल्यांकन	अफजाल अहमद,	14
6	अधुनिक समाजात मानवी मूल्यांचे महत्व	डा.शेडगे.व्ही.एस,	17
7	**आधुनिक समाजात नैतिक मूल्यांचे महत्त्व**	**प्रा. गव्हाणे आर.बी.**	20
8	भारतीय व पाश्चात्य मूल्य व्यवस्थापन	डॉ सुनिल भोईटे	23
9	संद्यकालीन मूल्यांसंदर्भात–भारतीय पुरुषार्थ विचार	प्रा एन. के. रासकर	26
10	Metaphysics of presence: hayavadana a case study	Dr. Jayashree Aher	31
11	चार्वाकाच्या नैतिक मूल्यांचा आधुनिक समाजावरील प्रभाव	डॉ ग्यानदेव मा.उपाडे	35
12	बौद्ध धम्मातील नीतीविचार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर	वैशाली बनसोडे	41
13	मानवी मूल्य आणि त्यांचे महत्त्व; एक दृष्टिक्षेप	कु. गायकवाड गौरी हेमकांत	43
14	A Philosophical Analysis of Human Society and Social Values	Javid Ahmad Mallah	48
15	महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक तत्वज्ञानातील मूल्यांची प्रासंगिकता	कांबळे उध्दव नरहरी	52
16	पुरूषार्थ : मानवी मूल्यांवरील भारतीय चिंतन एक विचार	श्री. राजपूत सचिन खलकसिंह	55
17	मानवी जीवन आणि मुल्ये	स्वाती बापूराव भोंगळे	58
18	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून मानवी मूल्यांचे स्वरूप : एक अभ्यास''	शेळके मिरा काशीनाथ	61
19	हेमचंद्र धर्माधिकारी यांची सामाजिक मुल्ये संकल्पना	प्रा.कांबळे माधव नरहरी	66
20	आधुनिक समाजात मानव व मुल्य यांचे स्थान	प्रा.सुखदेव नि. लोखंडे	70
	Human Society and Prohibited Social Values		
1	मानवी समाज आणि प्रतिबंधित सामाजिक मूल्य	डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर	73
2	मानवी जीवन व प्रतिबंधक सामाजिक मूल्ये	डॉ. घोलप सुवर्णा भास्कर	75

मानवी समाज आणि प्रतिबंदित सामाजिक मूल्य

डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमूख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

मानवी समाजाचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. मानवी समाजाच्या रचनेबरोबर काही सामाजिक आदर्श, दंडक वा नियमही निर्माण झाले. हे सामाजिक आदर्श ज्या त्या मानवी समाजासाठी महत्त्वाची असतात, ते त्या समाजासाठी मौल्यवान असतात. डॉ. नागोराव कुंभार सांगतात त्याप्रमाणे, "मूल्यच मुळतः मौल्यवान असतात." अशा या मौल्यवान मूल्यांचा इतिहासही मानवी इतिहासाइतकाच प्राचीन आहे. आपल्याला या ठिकाणी हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे की, मानवी विकासाबरोबर मुल्यांचाही विकास होत राहिला आहे.

मानवी समाजाची एक संस्कृती आहे. ती संस्कृती समाजाच्या विशिष्ट जीवन पद्धतीला सूचित करीत असते. त्याच्या रुढी परंपरेला, त्याच्या नैतिक नियम, सिद्धांत, विचार, शिक्षण पद्धती आणि जीवनाला पाहण्याच्या पद्धतीला सूचित करीत असते. परंतु याच संस्कृतिसमोर संकट तेव्हा उभे होते, जेव्हा तिचा सामना एखाद्या नाविण्यतेशी होतो, जी यथास्थितिच्या संदर्भात प्रश्न उभा करते आणि नवीन पर्यायाची मागणी करते, जुन्याच्या बदल्यात नवीन मुल्यांच्या स्थापनेवर भर देते.(1) एका अर्थाने हा जुन्या व नव्या मुल्यांमधला संघर्षच होय. ज्यात कुठल्यातरी एका घटकाच्या मुल्यांकडे दूर्लक्ष होणे किंबहुना त्या मुल्यांना प्रतिबंद लागणे साहजिक असते.

मानव आणि मानवी समाज यांचा समवायी संबंध आहे. मात्र मुल्याच्या अनुषंगाने आज मानवाच्या संदर्भातून वैयक्तिक मूल्य आणि समाजाच्या संदर्भातून सामाजिक मूल्य असा भेद मोठ्या प्रमाणात होत असताना दिसून येत आहे. वास्तविक पाहता हा भेद आहेच. मात्र त्यात सहसंबंध देखील असतो. ह्याकडे मानवी समाजाचे जाणीवपूर्वक दूर्लक्ष होताना दिसून येत आहे. पण असे हे का व्हावे ? या संदर्भात असे म्हणता येईल की, जेव्हा समाजाकडून वैयक्तिक मुल्यांची आणि व्यक्तीकडून सामाजिक मुल्याची जपवणुक केली जात नाही तेव्हा अशी समस्या उद्भवत असते. पण व्यक्ती व समाजाची अशी ही मानसिकता का झाली असावी ? असाही एक प्रश्न उपस्थित होतो. या संदर्भात मानवेंद्रनाथ रॉय याच्या भूमिकेचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. त्यांच्या दृष्टिकोनातून, "मुल्याची निर्मिती मानव समाज करीत नाही. तर मानव व्यक्ती करतो. मुल्याच्या मापदंडाच्या रुपात सुद्धा समाजाच्या तुलनेत व्यक्तिचीच भूमिका महत्त्वपूर्ण असते."(2) निश्चितच रॉय यांचा हा नव मानववाद व्यक्तिला आत्म केंद्रित (Srlf Centerd) व संकुचित बनविणारा आहे. याशिवाय व्यक्ती व समाज जीवनातील मूल्य संवर्धनाच्या संदर्भातील उदासीनते करीता डॉ. ऋषीकांत पाण्डे अद्योगिकरणाला कारण मानतात. त्यांच्या मते, अद्योगिकरणामुळे व्यक्ती आत्म केंद्रित (Srlf Centerd) आणि समाजाप्रती संवेदनशून्य बनला आहे.(3) अर्थात अद्योगीकरणाच्या प्रभावामुळे समाजही संवेदनाहीन बनला आहे. परिणामी समाजात प्रतिबंदित मूल्याचे विषय आज मोठया प्रमाणात समोर येत आहेत.

वास्तविक पहाता प्रत्येक काळात असे काही मूल्य असतात की, जे त्या त्या काळानुसार प्रतिबंदित झालेली असतात आणि ती कालांतराने रुढी वा परंपरेच्या रुपाने कित्येक वर्षापर्यंत मूल्य रुपानेच अस्तित्वात असतात. परंतु ती भविष्यातही राहतील अशी शक्यता मुळीच नसते. उदा. वैदिक काळात मातृसत्ताक पद्धत अस्तित्वात होती. मात्र पुरुष प्रधान संस्कृतीच्या प्रभावात ती प्रतिबंदित झाली. विशेष म्हणजे हीच पुरुष प्रधान संस्कृती रुढी परंपरेच्या रुपातून मूल्य म्हणून आजही अस्तित्वात आहे. मात्र तिचे अस्तित्व भविष्याच्या संदर्भात अनिश्चित आहे.

मूल्य ही तीन प्रकारची असतात. एक सापेक्ष व निरपेक्ष मूल्य, दोन साधन व साध्य मूल्य. याशिवाय नित्य व अनित्य मूल्य असाही अणखी एक तिसरा प्रकार मानला जातो. सामान्यतः या तिसऱ्या प्रकाराचा संबंध विशेष मुल्यांशी वा आदर्श मूल्यांशी येतो. ही आदर्श मूल्य (उदा.: आनंद, समाजहित, राजनिष्ठा, ज्ञानार्जन, धर्माचरण) तेवढीच नित्य व निरपेक्ष असतात, तिच स्वतः साध्य असतात. तर साधन व परतः साध्य (डॉक्टरचे पेशंटच्या समाधानासाठी खोटे बोलणे) मूल्य ही अनित्य व सापेक्ष असतात. या सर्व प्रकारांचा उल्लेख सामान्यतः वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, वैज्ञानिक क्षेत्राला अनुसरुन होत असतो. ही सर्व क्षेत्र मानवी अस्तित्वाची अभिव्यक्ती असते. ही अभिव्यक्ती गतिहीन मुळीच नसते. त्यात मूल्य रुपाने गती असते. अर्थात ही मुल्यच गतीचे सहाय्यक असतात. एकंदर मूल्य ही

मानवी अस्तित्वाच्या अभिव्यक्तीसाठी विशेषतः मानवी ध्येयासाठी आवश्यक असणाऱ्या पोषक अशा वतावरणाची निर्मिती करतात.

सामान्यपणे व्यक्तीच्या जीवनाला समग्रपणे संपन्न करणाऱ्या तत्त्वाला मूल्य म्हटले जाते. परंतु जीवनाला समग्रपणे संपन्न करणे म्हणजे काय ? हा या ठिकाणचा प्रश्न आहे. कारण जीवनाची समग्रता ही केवळ भौतिक सुखालाच अनुसरुन नसतात. त्यात बौद्धिक, मानसिक व अध्यात्मिक घटकांचा मोठा वाटा असतो. त्या शिवाय व्यक्तीच्या जीवनाला समग्रता लाभत नाही. शिवाय फक्त भौतिक सुख हे तेवढेच मानवी जीवनाला समाधान देऊ शकत नाही. परंतु आज समाजाचे निरीक्षण केले असता दिसून येईल की, भौतिक सुखाला अनुसरुन हा समाज साधन मुल्यांविषयी आग्रही भूमिका घेत आहे. त्याच्यासाठी साध्य मूल्य अनपेक्षीत तर आदर्श मूल्य ही निव्वळ कल्पनाच ठरत असल्याचे दिसून येत आहे. खऱ्या अर्थाने साधन मुल्यांची जपवणुक करणे हेच त्याच्यासाठी साध्य मूल्य बनले आहे आणि याच संदर्भातून विचार केला तर प्रतिबंदित मुल्याचा प्रश्न उद्‌भवतो. अन्यथा त्याच्याविषयी केवळ भ्रम आहे.

प्रामुख्याने मानवी जीवनावर कुटूंब, शाळा, समाज, धर्म इत्यादी संस्थेचा प्रभाव पडत असतो. या प्रत्येक संस्थेतून मानवी जीवनात काही मूल्य संक्रमित झालेली असतात. या प्रत्येक संस्थेचे ध्येय वा उद्‌देश स्वतंत्र असल्यामुळे त्यांच्या मुल्यातही वेगळेपणा पाहवयास मिळतो. परिणामी सार्वभौम (Universal) संस्थेची आणि त्याला अनुसरुन काही सार्वभौम मुल्यांची कल्पना अर्थहीन ठरते.

सद्यस्थितीत सोशल मिडीयाच्या माध्यमातून 'ज्ञपे वि स्वअम'ए[A] 'त्पहीज वि स्वअम'[B] या सारख्या संघटनात्म चळवळी कार्यरत असल्याचे पाहवयास मिळते. या चळवळीच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण केले असता, त्यातील प्रत्येक सदस्य घटकाला कायद्याने दिलेल्या 'स्वातंत्र्य' या मुल्याचा अनिर्बंधपणे उपभोग घेण्याची इच्छा वा समाजाकडून त्या संदर्भात मुभा मिळण्याची अपेक्षा आहे. या चळवळीची विचार पद्धती तार्किक, वैज्ञानिक असल्यामुळे त्यावर निर्बंध करणे प्रासंगिक ठरत नाही. मात्र धर्म, संस्कृती, रुढी परंपरेचे कट्‌टर पुरस्कर्ते आपल्या स्वतंत्र विचार पद्धतीमुळे अशा या चळवळीचा विरोध करतात. किंबहुना अशा या चळवळीस प्रतिबंद लावण्याचा प्रयत्न करतात. कारण त्याच्या दृष्टिने अशा या चळवळीच्या भावना तात्पूरत्या असतात, त्यात सत्यता कमी आणि कृत्रिमता अधिक असते. अशाच प्रकारचा विचार लेविस किलियन यांनीही व्यक्त केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार "सामाजिक चळवळीत भावना हा घटक फार बारकाइने बघने आवश्यक आहे. कारण बऱ्याचदा त्यातून कमी यश संपादन होते."(4) निश्चितच लेविस यांचा हा विचार चिंतनीय आहे. त्यातून 'दृढ भावना असलेल्याच मुल्यांचे अस्तित्व दिर्घकाळ टिकणारे वा नित्य असते.' असे प्रतित होते. परतु शेवटी भावना हया भावना असतात. त्या क्षणिक असो वा नित्य, त्या मानवी समुहाच्या असोत वा एखाद्या व्यक्तिच्या, त्याविषयी अनादार बाळगणे अथवा त्यांचा तिरस्कार करणे हेच खरे मुल्यांच्या प्रतिबद्‌दतेसाठी कारण ठरते.

तेव्हा तात्त्विक दृष्टया विचार केला असता असे म्हणता येईल की, समाज जीवनामध्ये अध्यात्माची पुर्नस्थापना करणे आवश्यक आहे. मात्र याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, अध्यात्म (चुपुतपजनंसपजल) म्हणजे धर्म (त्मसुपहपवद) नव्हे. कारण धर्म हा कर्मकांडानी युक्त असतो. तर अध्यात्म कर्मकांडावरुन स्वतंत्र, अंतकरणाची शुद्धता (प्दजमतदंस च्नतपपिबंजपवद) असते आणि अशी ही शुद्धता केवळ समर्थनीय कार्य करीत नाही तर स्वीकारनीय कार्य करते. अर्थात प्रतिबंदित मुल्यांचा विषय संपुष्टात आणण्यासाठी नित्य व निरपेक्ष, विवेक स्वरुपातील अध्यात्म मूल्य हाच एकमेव पर्याय आहे.

Spirituality Internal purification

****

A) Kiss of Love

B) Right of Love

संदर्भ :-

1) पुढारी, 27,1-4,2006-2007 पृ.156

2) मराठी मानवतावाद, वेंडीजे, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, पृ. 89

3) दार्शनिक त्रैमासिक, वर्ष 56 अंक-2 पृ.12

4) सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ, प्रा.च.म.मु.वि. ऑगस्ट 2014, पृ.77

SUCCESS PUBLICATIONS
Radha Krishna Apartment, 535, Shaniwar Peth,
Appa Balwant Chowk, Opp. Prabhat Theatre, Pune - 30.
Ph. No. 24433374, 24434662, 64011289, Mobile : 9325315464
E-mail : sharpgroup31@rediffmail.com
Website : www.sharpmultinational.com